# सणवार उत्सव व्रतवैकल्य













लेखन व संकल्पना : गुरुदास

# सणवार-उत्सव
# व्रतवैकल्य

संकल्पना व संकलन

**गुरुदास**

साटम उद्योग™
www.satamudyogbooks.com

# अनुक्रम


- **हृद्‌गत/३**

- **सणवार/१२ ते ३१**

  गुढीपाडवा/१२, अक्षय्य तृतीया/१४, वटपौर्णिमा/१५, आषाढी एकादशी/१६, दिव्याची अवस/१७, नागपंचमी/१८, नारळी पौर्णिमा-रक्षाबंधन/१९, पिठोरी अमावास्या/बैलपोळा/२१, गौरी-गणपती/२२, पितृपक्ष/२३, नवरात्री/२४, दसरा/२५, दीपावली/२६, तुलसी विवाह/२८, चंपाषष्ठी/२९, शाकंभरी नवरात्री/२९, मकर संक्रांत/२९, गणेशजयंती/३०, महाशिवरात्र/३०, होलिकोत्सव/३१

- **उत्सव/३२ ते ३८**

  रामनवमी/३२, हनुमान जयंती/३३, नृसिंह जयंती/३४, बौद्ध पौर्णिमा/३४, गुरु पौर्णिमा/३५, गोकुळाष्टमी/३६, दत्त जयंती/३७

- **व्रत वैकल्ये/३९ ते ४५**

  चैत्रागौरी/४०, प्रदोषव्रत/४१, चातुमार्सातील व्रते/४१, एकादशी व्रत/४२, जीवंतिका पूजन/४२, मंगळागौरी/४३, हरतालिका/४३, ऋषीपंचमी/४४, संकष्ट चतुर्थी/४४

- **लक्ष्मी व्रते/४६ ते ४८**

  श्रीलक्ष्मी व्रत/४६, वैभवलक्ष्मी व्रत/४७, संतोषी मातेचे व्रत/४७



- **ई-बुक आवृत्ती**
- **प्रकाशक : हेमंत स. साटम**
- **मुद्रक : साटम उद्योग**

  २०३, अमित इंडस्ट्रियल इस्टेट, लालबाग, मुंबई-४०० ०१२.

  ८१६९९ ८४९२७



© **सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन**

# हृद्‌गत

**आ**ज आपल्याला इंग्रजी महिन्यानुसार कालगणना करणारी दिनदर्शिका सुपरिचित आहे. या दिनदर्शिकेचं नवं वर्ष १ जानेवारीला सुरु होतं आणि ३१ डिसेंबरला संपतं. पण आपली हिंदू कालगणना करणारी दिनदर्शिका मात्र चैत्र महिन्यापासून सुरु होते. या दिनदर्शिकेला आपण पंचांग म्हणतो. तिथी, वार, नक्षत्र, योग आणि करण हे कालगणनेचे पाच प्रमुख अंग त्यात तिथीवार दिलेले असतात म्हणून त्यास पंचांग म्हणतात. पूर्वी केवळ याच पंचांगानुसार आपले दैनंदिन व्यवहार, सणवार, उत्सव, व्रत-वैकल्ये आणि इतर उपक्रम पार पाडले जात असत. अर्थात आजही हे व्यवहार जरी इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे होत असले तरी आपल्या परंपरा आपण पंचांगानुसारच पार पाडतो. संकष्टीचा चंद्रोदय असो, एकादशीचा उपवास असो, प्रदोषकाळ असो की, पौर्णिमा-अमावास्यांचा समाप्ती काळ असो, ही सारी माहिती आपल्याला पंचांगात मिळते.

हे पंचांग आपण जर बारकाईने पाहिले तर आपल्याला असं दिसेल की, असा एकही महिना त्यात नाही की, ज्या महिन्यात सण किंवा एखादा उत्सव नाही. अगदी वर्षाचा पहिला दिवसच गुढीपाडवा म्हणून आपण साजरा करतो. हा दिवस म्हणजे चैत्र शु. प्रतिपदा. त्या पाठोपाठ येते रामनवमी. चैत्र शु. प्रतिपदा ते नवमी असे नऊ दिवस चैत्री नवरात्र साजरा करण्याचीही अनेक कुटुंबात परंपरा असते. मग येते हनुमान जयंती. त्यानंतर वर्षभर सणवार आणि उत्सवांची एका पाठोपाठ एक अशी माळच सुरु होते. हिंदु कालगणनेनुसार जे ऋतुचक्र आहे त्यातील वसंत ऋतु हा सर्व ऋतुंचा राजा म्हणजे ऋतुराज समजला जातो. त्याचा प्रारंभही चैत्रात सुरु होतो. निसर्ग तर या काळात फळाफुलांनी नुसता बहरलेला असतो. फळांचा राजा म्हणजे आम्रफळ. या आम्रफळांनी आम्रवृक्ष तर डंवरलेले असतातच शिवाय कोकिळ पक्षालाही याच काळात सुरेल कंठ फुटतो. वातावरणातला उष्मा वाढत असला तरी निसर्गातील चैतन्यामुळे माणूसही प्रसन्न असतो. त्याच्या मनात घर करुन असलेलं जीवनाचं गोड गाणं मग ओठांवर खेळू लागतं.

**भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे । दावित सतत रुप आगळे ।**
**वसंत वनात जनात हांसे । सृष्टी देवी जणूं नाचे उल्हासे ।।**

वैशाख-ज्येष्ठ गेले की, मग आषाढ सुरु होतो. "**ग्रीष्म संपता मृगापरी मृग धावत हा आला घेऊनि मेघांच्या माला**", असं निसर्गाचं चित्र पालटतं आणि वर्षा ऋतूला प्रारंभ होतो. आषाढी एकादशी ते कार्तिकी एकादशी असा तब्बल चार महिन्यांचा काळ म्हणजे सणवार, उत्सव आणि व्रत वैकल्यांची नुसती रेलचेल असते. हाच चातुर्मास ! खरं तर या चातुमार्सातील बहुतांश काळ हा पाण्यापावसाचा असतो. माणसाच्या एकूण दैनंदिन जीवनालाच खूप मर्यादा असतात. शेतकरी मात्र खुष असतो. आषाढात तर पाऊस नुसता आकाश फाटल्यासारखा कोसळत असतो. ओल्या मातीच्या मृदगंधाबरोबर माणसाच्या मनालाही पालवी फुटते. चातुर्मास म्हणजे पावसाच्या सरीने माणसाच्या जीवनाला लाभलेला जणू आठवा सूर.

आषाढी आकाशात काळ्याशार मेघांची दाटी, विजांचा लखलखाट आणि आसमंत भेदून जाणारा कडकडाट. मुसळधार पावसामुळे दुथडी भरुन सुसाट वाहणाऱ्या नद्या, ओढे आणि नाले, डोंगरदऱ्यातून थेट जमिनीवर उडी घेत कोसळणारे धबधबे. सारी सृष्टीच कशी चैतन्याने चूर झालेली असते. मग येतो निसर्ग सौंदर्याचा नजराणा लेवून श्रावणमास. हिरवाकंच शेला पांघरलेली पृथ्वी पाहिली की ओठावर पुन्हा गाणं घुमू लागतं.

या महिन्याचं अतिशय मनोहारी वर्णन बालकवींनी मोठ्या सार्थ आणि समर्पक शब्दात केलं आहे. श्रावणातल्या निसर्गाबरोबरच माणसाच्या देहमनात त्यामुळे जे चैतन्य ओसंडतं तेही त्यांनी आपल्या "**श्रावणमास**" या कवितेत अतिशय बोलकं केलेलं आहे. श्रावण महिन्याचं ते जणू शब्दचित्रच !

**श्रावणमासी हर्षमानसी । हिरवळ दाटे चोहिकडे ।**
**क्षणांत येते सरसर शिरवे । क्षणांत फिरुनी ऊन पडे ।**
**किंवा**
**झालासा सूर्यास्त वाटतो । सांज अहाहा ! तो उघडे ।**
**तरुशिखरावर उंच घरावर । पिवळे पिवळे ऊन पडे ।**
**किंवा**
**देवदर्शना निघती ललना । हर्ष माईंना ह्रदयात ।**
**त्यांच्या वदनी ऐकुनी घ्यावे । श्रावण महिन्याचे गीत ।।**

असा हा अचंबित करुन प्रफुल्लित करणारा श्रावण म्हणजे सण-उत्सवांची मोठी लयलूटच. नागपंचमी, रक्षाबंधन, राखी पौर्णिमा, श्रावण सोमवार, संपत शनिवार, मंगळागौर, दिव्याची अवस, पोळा, व्रतांचे उपास-तापास, देवदर्शन, एकादशीचा जागर, सर्वत्र कसं उल्हासाचं सूखच अवतरतं आणि भक्तिभावाला नुसता पूर येतो. ग्रामीण भागात तर आणखीनच उत्साह असतो. श्रावणातला हा उत्साह भाद्रपद महिन्याच्या प्रारंभी आणखी दुणावतो तो गणेश उत्सवामुळे. गणेश चतुर्थी ते अनंत चुतर्थीपर्यंत घराघरात पारंपारिक गणेशपूजा होते. गौरी येतात. अनंताची पूजा होते. आरत्यांना तर नुसता ऊत येतो. सार्वजनिक गणेशोत्सवांचा नूर आणखी वेगळाच. तेथे तर आगळ्या वेगळ्या उपक्रमांचं नुसतं मोहोळ उठतं. सृष्टीचं गहिरं रुप आणि सण-उत्सवांच्या अपूर्वाईचा शिणगार आपल्या मराठी कवितेत कसा कोंदून भरलेला आहे. या सौंदर्याने मन अगदी भावविभोर होतं. या उत्कट आनंदातच भाद्रपदातला गणपती उत्सवही पार पडतो. आणि मग येतो तो पितृपक्ष. आपल्या वाडवडिलांचं, पितरांचं श्राद्ध-तर्पण करुन त्यांच्याबद्दलचा कृतज्ञताभाव व्यक्त करण्याचा हा पंधरवडा. या पंधरवड्यातला मनोभाव थोडा वेगळ्या घाटाचा खरा पण त्यात कृतकृत्यता असते. पूर्वसूरींबद्दलचा अत्यंतिक आदरभाव असतो.

मग सुरु होतं नवरात्र. नंतर दसरा येतो, दिवाळी येते. दिवाळी म्हणजे प्रकाशाचीच पूजा. आत व बाहेरच्या अंधाराला दूर करणारी तेजाची आरती. मानवी संबंधातले सारे अंतराय दूर करुन अंतःकरणात मंगलतेची, सौहार्दाची उगवणारी पहाट म्हणजे दिवाळी. तिचा दिमाख असा की, चातुर्मास सरेतोवर तो मनातून हटतच नाही. मग येते दत्त जयंती, मकरसंक्रात आणि महाशिवरात्र. होळी आणि धुळवड हे वर्षअखेरच्या फाल्गुनातले सणवार. मग पुन्हा नवीन वर्ष ! तर असा हा आपला सण आणि उत्सव यांचा समृद्ध वारसा. आपलं भावजीवन ढवळून काढणारा आणि मनोवृत्तींना उत्तेजित करुन उन्नत करणारा. वैदिक संस्कृतीने माणसासाठी जी भावमधुर जीवनशैली वेगवेगळ्या परंपरांमधून काळवेळेचं भान राखून निर्माण केली आहे, तिचाच हा मनोज्ञ आविष्कार.

वैदिक संस्कृती आणि वैदिक धर्म ही काही पाच-दहा वर्षाच्या परंपरेतून निर्माण झालेली जीवनशैली नव्हे. ती शेकडो वर्षांच्या अनुभवातून, निरीक्षणातून निर्माण

झालेला आणि मानवेतर सृष्टीशी सुसंवाद साधणारा जीवनौघ आहे. कालौघाबरोबर तो सतत वाहणारा आहे आणि वाहता वाहता विस्तारत जाणाराही आहे. सणवार आणि उत्सवांच्या आयोजनामागील एकूण भूमिका जर आपण तपासली तर आपल्या पूर्वसूरींनी मानवी जीवनाचा आणि या मानवी जीवनाचा इतर जीवसृष्टीशी असलेल्या परस्पर संबंधांचा किती बारकाईने विचार केला होता याची कल्पना येते.

सर्वसामान्य माणसाची प्रपंचाबद्दलची ओढ. त्याच्या दैनंदिन गरजा, विचार, विकार, त्याची मानसिक जडणघडण या अंगाने विचार करतानाच प्राणी, वृक्ष, नद्या, वनसंपदा, डोंगर-पर्वत यांची माणसाच्या दृष्टीने असलेली उपयुक्तता, त्यांच्या ठायी असलेली विविध गुणसंपदा, ऋतुचक्र, आहार-विहार, आरोग्य, वैद्यकशास्त्र, निसर्गाची अनुकूल-प्रतिकूलता, सामूहिक जीवन, या जीवनावर पंचमहाभूतांचे होणारे दृष्य-अदृष्य परिणाम या सर्व गोष्टींचा त्यांनी खूप सम्यक विचार केला होता आणि तो शास्त्रशुद्ध होता. आपल्या सभोवताली पसरलेल्या अनंत विश्वात विखुरलेली चराचर सृष्टी ही बाह्यतः विविधतेने नटलेली असली तरी तिच्या ठायी एकच एक शाश्वत शक्ती कार्यरत आहे आणि ही शक्ती म्हणजेच चैतन्य होय. हाच परमात्मा, हाच भगवंत अशी अनुभूती त्यांना आलेली असल्याने बाह्यजीवनात, लौकिक जीवनात, दैनंदिन व्यवहारात माणसाने या सृष्टीतत्वाशी सुसंवाद साधून मूळ चैतन्याचाच गुणगौरव करावा आणि आपलं ऐहिक जीवन सुखी व समृद्ध करावं, अशा एका उत्कट आकांक्षेतून सणवार-उत्सव आणि व्रतवैकल्यांची परंपरा निर्माण झाली आहे. किंबहुना संपूर्ण वैदिक धर्माचा आणि तत्वज्ञानाचा हाच गाभा आहे. बाह्यतत्वांशी सुसंवाद साधणे आणि तो साधता साधता मिळणाऱ्या आनंदातून अंतर्मूख होऊन आतल्या अंतःकरणात असलेल्या भगवंताशी म्हणजेच अखंड आनंदाशी एकरुप होणे.

या संवादाच्या भूमिकेतूनच आपल्या सणवारात, उत्सवात, आनंद सोहळ्यात देवपूजा आहे, भूमीपूजा आहे, जळाची पूजा आहे. नद्या, सरोवरे, डोंगर-पर्वत, वृक्ष-लता, भूचर-जलचर-खेचर वर्गातील पक्षी तसेच प्राण्यांचीही पूजा आहे. या पूजेमागे गुणगौरव तर आहेच शिवाय त्यांच्या उपयुक्ततेबद्दलचा कृतज्ञता भाव आहे. औंदुबर, वड, पिंपळ, तुळस यासारख्या वनस्पतींची पूजा त्यासाठीच केली जाते. तुळस ही तर बहुगुणी वनस्पती असल्याने तिची रोज पूजा करण्याचा परिपाठ

असावा, असं आपला धर्म सांगतो. प्राण्यांपैकी गाय, बैल, उंदीर, मुंगूस, मोर यांचीही आपण पूजा करतो. नागपंचमीच्या दिवशी तर आपण विषारी नागाचीही पूजा करतो. आपल्या ज्या देवदेवतांच्या मूर्त्या आणि तसबिरी आहेत किंवा वेगवेगळ्या मंदिरातून जी चित्रशिल्पे कोरलेली आहेत त्यात या देवदेवतांच्या मागेपुढे आणि अंगाखांद्यावर हे प्राणी-पक्षी मुक्तपणे विसावलेले आपण पाहतो. त्यातच त्यांच्यातील गुणवत्ता आणि उपयुक्तता व्यक्त होते.

नद्या आणि पर्वतांना आपल्या संस्कृतीने सदैव शिरोधार्य मानलेलं आहे. गंगेसारखी नदी तर प्रत्यक्ष शंकराने आपल्या शिरोभागी मिरवली आहे तर गोवर्धन पर्वत प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाने आपल्या करंगळीवर तोलून गोकुळवासियांवर निश्चिंततेची सावली धरली आहे. याच परंपरेतून आपण आपल्या नद्यांचा जीवनदायिनी म्हणून पूजा करुन गौरव करतो. कारण आपली संस्कृती याच नद्यांच्या काठी आणि डोंगरदऱ्यांच्या आश्रयाने विकसित झाली आहे. गंगा, यमुना, कृष्णा, कावेरी, गोदावरी, नर्मदा या नद्यांच्या काठी त्यांची मंदिरं उभारण्यात आली असून तेथील स्थानिक लोक या नद्यांच्या गौरवार्थ आजही दरवर्षी हृद्य महोत्सवांचं आयोजन करतात. वाई येथे होणाऱ्या कृष्णामाईचा उत्सव आजही प्रसिद्धच आहे. नर्मदेची प्रदक्षिणा करणारे असंख्य भक्त आहेत. हिमालयाला तर सगळे भारतीय शिरसावंद्य मानतात. त्याची पूजा करतात. कारण ती आपली तपोभूमी आहे. पण इतर पर्वतांचीही अनेक ठिकाणी पूजा केली जाते. त्यांना प्रदक्षिणा घातली जाते. त्र्यंबकेश्वर येथील ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा ही अशीच उत्कट पूजा होय. कोकणात गणपतीपुळे या पर्यटन स्थळी जे श्रीगणेशाचं प्रसिद्ध स्थान आहे तेथेही ज्या डोंगरात हा गणपती आहे त्यास प्रदक्षिणा घातली जाते. कोकण व मुंबई या समुद्र किनारी असलेल्या प्रदेशात फार पूर्वीपासून सागरपूजा करण्याची प्रथा आहे. नारळी पौर्णिमेला आजही हा सोहळा साजरा होतो. कोकणात दर तीन वर्षांनी प्रगट होणाऱ्या राजापूरच्या गंगेचं दर्शन घेण्यासाठी लाखो भक्त तेथे धाव घेताना दिसतात.

व्रत-वैकल्ये ही खूपशी व्यक्तिगत स्वरुपाची असतात तर कुळधर्म-कुळाचार आणि सण हे कौटुंबिक पातळीवर साजरे केले जातात. पण उत्सव मात्र सामूहिक सोहळा असतो. उत्सवांचं आयोजन करताना म्हणूनच सामूहिक आनंदाचा, सामूहिक संवादाचा आणि त्यातून समाजातील सर्व घटकात एकजीवित्व आणण्याचा प्रयास

असतो. कारण अनेकांच्या योगदानातून तो साजरा होतो. कुणी श्रमाचं योगदान करतो, कुणी सेवेचं योगदान करतो तर कुणी आर्थिक योगदान करतो. थोडक्यात तन-मन-धनाने हे सोहळे संपन्न होतात. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना त्यात सामावून घेतलं जातं. त्यांचे मान-पान राखले जातात. गुणगौरव केला जातो. माणसं जोडून सामूहिकरित्या समाजमनाचं उत्थापन करणे हा या उत्सवांचा हेतू असतो. लो. टिळक यांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव व सार्वजनिक शिवजयंती या दोन उत्सवांची सुरुवात केली ती याच उद्दिष्टपूर्तीसाठी.

पूर्वीच्या काळी स्त्रियांचे व्यवहार खूप मर्यादित होते. कारणाव्यतिरिक्त बाहेरच्या जगाशी सहज संपर्क त्याकाळी निषिद्ध मानला जात असे. पण सणवार-उत्सवांच्या सोहळ्यात हे निर्बंध सैल होत असत आणि स्त्रियांनाही या सोहळ्यात मोठं मानाचं स्थान दिलं जात असे. चातुर्मासातल्या अनेक सणवारांच्या निमित्ताने स्त्रियांना जगाचं द्वार मुक्त केलं जात असे. वटपूजा, मंगळागौरी, हरतालिकापूजन, चातुर्मासातील कथा-पुराणं, हळदी-कुकंवाचे समारंभ अशा अनेक प्रसंगी स्त्रियांना मोकळीक दिली जात असे. सामाजिक आरोग्याचं असं अवधान ठेवतानाच आपल्या पूर्वसूरींनी या सणवार-उत्सवांच्या आयोजनामागे व्यक्तिगत व सामूहिक आरोग्याचं भानही राखलेलं आहे.

व्यक्तिगत आरोग्याबाबत आपल्या वैदिक संस्कृतीने किती चांगला विचार केला होता याचं ठळक उदाहरण द्यायचं तर चातुर्मासाचं देता येईल. या चातुर्मासात वैयक्तिक पातळीवर अनेक व्रत-वैकल्ये करावी, असे धर्मशास्त्रात सूचित केलं आहे. त्यानिमित्ताने उपवासही केले जातात.

चातुर्मासाचा बहुतांश काळ हा वर्षा ऋतूचा असतो. हवामान तसं प्रतिकूल असतं. त्याचा परिणाम शरीर प्रक्रियांवर होतो. यावेळी जठराग्नी मंद असतो. पचनशक्ती मंद झालेली असते. या काळात प्रकृतीमान जर चांगले ठेवायचे तर खाणे-पिणे, आहार-विहार आणि विकारांवरही मर्यादा हवी. ताबा हवा. नाहीतर व्यक्तिगत आरोग्यच नव्हे तर सामूहिक आरोग्यही धोक्यात येऊ शकतं. विशेष करुन ग्रामीण भागात तर ही शक्यता अधिक असते. हा धोका टाळावा म्हणून चातुर्मासातील आपल्या धर्माचरणात नेमधर्म, जपजाप्य, सण-उत्सव, पारायणे,

अनुष्ठाने यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यामुळे आरोग्याबरोबरच देहविकारांवरही नियंत्रण राखता येतं. मानवी जीवनातील अनेक शक्यतांचा ताळमेळ घालून "**प्रपंचातूनच निवृत्तीकडे**" हे जे आपल्या संस्कृतीचं अंतिम उद्दिष्ट आहे, त्याकडे माणसाच्या चित्तवृत्ती वळविणे हा आपल्या बहुतांश सर्वच परंपरांचा जो उद्देश आहे, तो सण-उत्सवांच्या आयोजनामागेही प्रकर्षाने आहे.

चातुर्मासातल्या निसर्गाची खेळी तर मोठी गूढ वाटते. या चार महिन्यात आपल्या भोवतालची सृष्टी आपल्यामध्ये अपरंपार चैतन्य साठवून घेते आणि उरलेल्या आठ महिन्यात ते ती इतरांसाठी अक्षरशः लुटत असते. एखाद्या वर्षी जर अवर्षण झालं तर या चैतन्यालाच आपण किती पारखे होतो, हे आपण जाणतो. साऱ्या जीवसृष्टीची रयाच हरवून जाते. माणसाचं जीवनही चैतन्याअभावी किती रुक्ष आणि उदासवाणं होतं हे काही सांगायला नको. दुःख, दैन्य, जरा, व्याधी, चिंता, भय अशा अनेक गोष्टींनीही त्याचं आयुष्य पार झाकळून जातं. हा झाकोळ दूर करण्यासाठीच आपल्या पूर्वसूरींनी धर्म-कर्म, पूजा, भक्ती असे चैतन्याने भरलेले पाणवठे निर्माण केले आहेत. सणवार आणि उत्सव हे त्यातलीच सरोवरे होत. माणसाने त्यातील जीवनरस भरभरुन प्यावा आणि तो इतरांनाही वाटावा, हेच आपल्या संस्कृतीचं प्रत्येक माणसाला आर्जवी सांगणं आहे. अर्थात तेथे कुठे सक्ती नाही, आग्रह नाही की, अभिनिवेश नाही. या सर्व आनंद सरोवरातून आपला घडा भरायचा की नाही, याची ज्याला त्याला मुखत्यारी आहे. स्वातंत्र्य आहे. ते काहीही असो, सणवार व उत्सव म्हणजे आनंदाचा सुकाळ होय ! कारण आपल्या अंतःकरणात जो आनंदघन आहे तो त्यामुळे द्रवू लागतो, बरसू लागतो. आणि अभ्यंतरीही सुकृताची पालवी फुटू लागते. भावभक्तीला मोहोर येतो आणि आत्मसुखालाही फळा-फुलांचा बहर येतो.

बाहेरच्या जगात देहपरायण होऊन गुंतलेल्या माणसाला आतल्या जिवा-शिवाच्या आनंदाला कशी मिठी घालावी, हे सहसा उमगत नाही. पण आपल्या पूर्वसूरींनी हा प्रश्न अगदी सोप्या पद्धतीने सोडवला आहे. त्यांनी सणवार, उत्सव, व्रत वैकल्ये, देवपूजा यासारख्या साधनांनी बाह्यसुखाचे रंग आंतरिक आनंदाच्या रंगात सहजगत्या मिसळून टाकण्याची युक्ती सांगितली आहे. त्यामुळेच माणसाच्या प्रवृत्तीपर

जगण्याला आगळे सौंदर्य तर प्राप्त झालेच शिवाय त्या जगण्याला श्रद्धा आणि भक्तीची डूबही मिळाली. म्हणून सणवार, उत्सवात "वैदिक संस्कृतीचं" अलौकिक सौंदर्य दडलेलं आहे. मात्र त्यासाठी या सौंदर्याकडे बघण्याची योग्य दृष्टी हवी. आपल्या सभोवताली जो निसर्ग आहे, जी जीवसृष्टी हे विश्व व्यापून आहे, ती आपली भोगवस्तू आहे, ती आपल्या मालकी हक्काची आहे या भूमिकेतून जर तुम्ही तिच्याकडे पाहणार असाल तर तुमच्या वाट्यास आनंदा ऐवजी दुःखच येईल, यात शंका असू नये. पण या सृष्टीबद्दल जर जिव्हाळा असेल, प्रेम असेल आणि कृतज्ञता भाव असेल तर मात्र तुमच्या अंतःकरणात जे भावविश्व निर्माण होईल ते परमसुखद असेल हे त्रिवार सत्य. संत तुकारामांनीच आपल्या अभंगातून तसा निर्वाळा दिला आहे. तुकोबा म्हणतातः

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।**
**येणे सुखे रुचे एकांताचा वास । नाही गुणदोष अंगा येत ।।**
**तुका म्हणे होय मनाशी संवाद । आपुलाची वाद आपणासी ।।**

समर्थ रामदास यांच्या काव्यातील निसर्ग वर्णने तर अतिशय जिवंत आणि बहारीची आहेत. त्यात लय तर आहेच शिवाय अपार निसर्गप्रेम आहे.

सणवार-उत्सवातून जो मनाशी संवाद होतो त्यातून या परंपरांनी यापूर्वीच आपल्याला खूप काही देऊन ठेवलं आहे. या परंपरांनी आपल्याला चांगली जीवनदृष्टी तर दिलीच पण त्याबरोबर लोककलांचा भला मोठा वारसा दिला. लोककथा, लोकसंगीत, लोकनृत्य, लोकगीतं, लोकनाट्य अशा अनेक लोककलांचा जन्म या परंपरेतून झालेला आहे. या कलाविश्वामुळे आपलं भावविश्वही संपन्न झालंय.

शेवटी एक गोष्ट आवर्जून सांगायची आहे ती ही की, आपल्या वैदिक संस्कृतीतून आलेल्या परंपरा ह्या मुख्यतः ग्रामीण संस्कृतीच्या आणि ग्रामीण संस्कृतीच वळण जपत जतन केलेल्या आहेत. ग्रामीण शैलीची जीवनपद्धती, ग्रामीण जीवनातलं एकूण दैनंदीन जीवन, त्याच्या गरजा आणि मर्यादा, त्या शैलीने राहणाऱ्या ग्रामीण जीवनाची सुखदुःख, आनंद-उल्हास, शेतीत घाम गाळून धान्य पिकविल्यानंतरच्या काळात येणारी रिक्तता, ग्रामीण लोकांच्या श्रद्धा आणि त्यांचं भावविश्व, त्यांचं एकूण

आर्थिक जीवन या सगळ्या अंगांचा विचार करुन या परंपरा रुढ झाल्या आणि बदलत्या कालानुरुप त्यांचा विस्तार झाला.

ग्रामीण जीवनातील लोकजीवन, कौटुंबिक जीवन, माणसा-माणसातील परस्पर संबंधाचे रेशीम धागे हे सारं काही गेल्या पन्नास-साठ वर्षात झपाट्याने क्षीण होत आहे. त्याला कारणे खूप आहेत. पण मुख्यतः या परिवर्तनाला जबाबदार आहे ते शहरीकरण, पाश्चात्य बनावटीचा शैक्षणिक विकास, वैज्ञानिक व यांत्रिक प्रगती, नगदी पैशाला आलेली बेभान चलती आणि दूरदर्शनचा जगाला पडलेला गच्च विळखा. दूरदर्शनमुळे बाकीचं जग आपल्या नको इतकं जवळ आलंय पण आपण मात्र आपल्याला अनोळखी वाटावं इतके आपल्या पासून लांब गेलो आहोत. आपल्या पूर्वआयुष्यात शेतीत पिकणाऱ्या धान्याबरोबरच तेथे हरिकृपेचे मळे डोलत असत. आता ते पूर्वीचे वैभव हरवून बसले आहेत. आपल्या आयुष्यातून राम कधीच गेला आहे. आपण रावणही होऊ शकलो नाही. आपला झालाय तो कुंभकर्ण. आपली जागच गेली आहे. याचा अर्थ असा नाही की, आपल्या परंपरा आहे तशा आचरणात आणाव्या. कारण त्यात काही कालबाह्य गोष्टी असू शकतील. पण काळानुरुप फरक करुन त्या स्वीकारायला काहीच हरकत नाही. आपल्या धर्माने, संस्कृतीने बदलण्याचं स्वातंत्र्य आपल्याला देऊन ठेवलंच आहे. या स्वातंत्र्याचा विवेकाने वापर करुन या परंपरा आपण आवश्यक ते बदल घडवून अंगी रुळवायला हव्या. कारण आपल्या जीवनातली रिक्तता भरुन काढण्याचे सामर्थ्य आपल्या संस्कृतीत आणि परंपरामध्ये आहे हे नक्की. आज शहरी जीवनात ईशकृपेचे मळे फुलवता आले नाहीत तरी हरकत नाही पण घरात, अंगणात श्रद्धेची दोनचार फुलझाडं निश्चितपणे वाढवता येतील. आज अशा प्रयत्नांची खूप खूप गरज आहे. सर्वसामान्य माणूस फार लहानसहान गोष्टींनी आनंदी होतो, सुखी होतो. ही लहानसहान सुखं वेचली तर त्यातून महासुख उपजतं. सणवार, उत्सव अशा लहानसहान सुखांचा भरभरुन आनंद देऊन आयुष्य सुखाने भरुन टाकू शकतात.

□□□